# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व कलावंत मेळावा १४ जून २००८ रोजी सायं. ६.३० वा. यशवंत नाटयमंदिर, माटुंगा येथे साजरा करण्यात आला. नाटयक्षेत्रातील विविध स्तरांवर उल्लेखनीय कार्य केलेल्या एकूण ६१ रंगकर्मींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळयाला मुंबई येथील नाटयरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला.

## नाटय लेखन स्पर्धा.

८८ व्या नाटय संमेलनाचा विशेष उपक्रम म्हणून नाटयलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत ५८ स्पर्धक सहभागी झाले. स्पर्धेसाठी आलेल्या अठ्ठावन्न नाटयसंहितातून परिक्षक मंडळाव्दारे निवडण्यात आलेल्या विजेत्यांना १४ जून रोजी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक विजेत्यांची नावे खालील प्रमाणे :—

| पारितोषिक | रक्कम | नाटकाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रू. २१,०००/— | 'काय डेंजर वारा सुटलाय' | श्री. संभाजी सावंत, मुंबई |
| व्दितीय क्रमांक | रू. ११,०००/— | 'पिल्लास त्या कळाले' | श्री. मनोहर सोमण |
| तृतीय क्रमांक | रू. ७,०००/— | 'कसं सांगू तुला' | श्री. संदीप शितोळे |
| विशेष पुरस्कार | रू. ३,०००/— | 'संगीत सूर संजीवनी' | श्री. अतुल पित्रे |

**उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व रू. १,०००/— प्रत्येकी**

| | |
|---|---|
| खो खो | श्री. भगवान हिरे |
| महापात्रा | श्री. अरविंद लिमये |
| टू इज कंपनी | श्री. मनोज कोल्हटकर |

## नाटय परिषदेची स्वस्त आणि दर्जेदार नाटक योजना

नाटय परिषद सभासद आणि रसिकांसाठी नाटय परिषदेतर्फे स्वस्त नाटक योजना जून २००७ पासून सुरू करण्यात आली. तीच योजना याही वर्षासाठी सुरू ठेवण्यात आली असून गेल्या वर्षाप्रमाणेच रसिकांना दहा दर्जेदार कार्यक्रम फक्त ७००/६००/४००/३०० रूपयांत दाखविण्यात येत असून आतापर्यंत सात कार्यक्रम दाखविण्यात आले आहेत. एकूण ४३७ सभासद या योजनेचा लाभ घेत आहेत.